# एकात्मिक कार्डासाठी भागीदाराचा शोध

## मेट्रो ३वरील प्रवाशांसाठी सुविधेसाठी हालचाली

म. टा. खास प्रतिनिधी

**मुंबई :** पश्चिम द्रुतगती मार्गावरील वाहतूककोंडीवर मात करण्यासाठी आवश्यक असलेल्या सीप्झ ते कुलाबा या मेट्रो-३मधून प्रवास करणाऱ्यांना एकात्मिक प्रवासी कार्ड मिळणार आहे. यासाठी मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाकडून (एमएमआरसी) बँकिंग भागीदाराचा शोध सुरू करण्यात आला आहे.

मेट्रो-३ ही सीप्झ ते कुलाबा अशी धावणार आहे. पूर्णपणे भूमिगत असलेल्या या प्रकल्पात एकूण २८ स्थानके असतील. तसेच चार अन्य मेट्रो मार्ग, मोनोरेल, पश्चिम रेल्वे व मध्य रेल्वे उपनगरीय स्थानकांशी हा मार्ग संलग्न असेल. यासाठीच एकात्मिक प्रवास कार्ड महत्त्वाचे ठरणार आहे. यासंबंधी निविदा मागवली आहे.

या निवीदेनुसार, मेट्रो ३चे तिकीट काढण्यासाठीचा व्यवहार कसा असेल, हे निश्चित करून प्रवाशांना कार्ड देणे व स्वयंचलित शुल्क संकलनासाठी एकात्मिक सेवा उपलब्ध करून देणे, ही कामे संबंधित बँकिंग भागीदाराच्या रूपातील कंत्राटदाराला करायची आहेत. यासाठी २० डिसेंबरपर्यंत अर्ज करायचा आहे.

### ... अशी असेल प्रणाली

मेट्रो-३ द्वारे पहिल्यांदाच स्वयंचलित तिकीट प्रणाली सादर केली जाणार आहे. यामुळे प्रवाशांना रांगेत उभे राहून तिकीट किंवा टोकन काढणे अपेक्षित नसेल. प्रवाशांना स्वतःहून ऑनलाइन तिकीट काढून ते स्कॅन करून रेल्वे स्थानकावर प्रवेश घ्यावा लागेल. त्याचवेळी मेट्रो-३शी अन्य मेट्रो मार्ग व उपनगरीय रेल्वे संलग्न असल्याने त्याचे एकाच वेळी एकात्मिक तिकीट काढता येणार आहे.

### सर्वाधिक संलग्न मार्गिका

मुंबईभर मेट्रो-३चे जाळे विणले जात असताना आता सध्या मेट्रो-३ ही सर्वाधिक महत्त्वाची असेल. ही मेट्रो एकीकडे उत्तर व दक्षिण मुंबईला जोडणारी असताना अन्य मेट्रो आणि उपनगरीय रेल्वे स्थानकांशी सर्वाधिक संलग्न असलेली मेट्रो हीच ठरणार आहे. त्यामुळेच एमएमआरसीएलकडून आता पुढील टप्प्यात मेट्रो-३ सर्वात आधी सुरू करण्यावर भर असेल. यातील आरे ते बीकेसी टप्पा पुढील वर्षभरात सुरू होण्याची शक्यता आहे. यासाठीच रेल्वे पूर्ण रूपात सुरू होण्याआधी स्वयंचलित व त्याचवेळी एकात्मिक अशी तिकीट प्रणाली सुरू करण्यावर एमएमआरसीचा प्रयत्न आहे.